महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२

दूरध्वनी क्र. ०२२-२२७९३५६२. Email ID : napu२३.mhpds@gov.in

---

क्रमांक : वैअमुं-१२२०/प्र.क्र.३६/ना.पु-२३. दिनांक : १७ डिसेंबर, २०२०

प्रति,

श्री. परेश कुमार दामजी सावला
अशिदु क्र. २३-ड-१११, दुकान क्र.१, फेलिक्स डिसोजा चाळ,
वाकोला व्हिलेज, सांताक्रुझ(पू.), मुंबई-०५५.

(उपनियंत्रक शिधावाटप, "ड" परिमंडळ, सांताक्रुझ(पू.), मुंबई यांच्या मार्फत)

विषय : पुनरीक्षण अर्ज/ रास्तभाव दुकान
महाराष्ट्र अन्नधान्य शिधावाटप(द्वितीय) आदेश, १९६६ चा खंड ३०.

उपरोक्त सांविधीक आदेशाखाली आपण दाखल केलेल्या पुनरिक्षण अर्जाप्रकरणी मा. मंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग) महोदयांनी दिलेल्या दि. १६ डिसेंबर, २०२० रोजीच्या निर्णयाची प्रत यासोबत जोडली आहे. आपणास सदर आदेशाची प्रमाणित प्रत हवी असल्यास प्रती पृष्ठ रू. १५/- याप्रमाणे एकूण दोन प्रतींचे रू. ३०/- (रूपये तीस फक्त) विभागातील रोख शाखेमध्ये भरणा करून पावती सादर केल्यानंतर प्रमाणित प्रत उपलब्ध करून देण्यात येईल.

(कृ. त्रि. कदम)
कक्ष अधिकारी
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

सहपत्र: वरीलप्रमाणे

प्रत : उपरोक्त निर्णयाच्या प्रतीसह योग्य कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. मा. मंत्री(अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव;
२. उपनियंत्रक शिधावाटप, "ड" परिमंडळ, सांताक्रुझ(पू.), मुंबई-०५५ **(नोंदणीकृत टपालाने)** यांनी उपरोक्त सांविधीक आदेशाची मुळ प्रत अपीलकर्त्यास आपल्या स्तरावर द्यावी व त्याची पोच आपल्या अभिलेख्यात ठेवावी;
३. कार्यासन नापु २३-संग्रहार्थ.

मा.मंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण ) यांचेसमोर

क्रमांक:- वैअमुं-१२२०/प्र.क्र.३६/ ना.पु.२३

श्री. परेश कुमार दामजी सावला (प्राधिकारपत्रधारक)
अशिदू क्र २३-ड-१११ दुकान क्र १,
फेलिक्स डिसोजा चाळ, वाकोला व्हिलेज,
सांताक्रुझ (पू) मुंबई ४०००५५ ..... वादी

विरुध्द

उपनियंत्रक शिधावाटप "ड" परिमंडळ,
सांताक्रुझ (पू.) मुंबई- ४०० ०५५. .....प्रतिवादी

आ दे श

उप नियंत्रक शिधावाटप "ड "परिमंडळ, मुंबई यांनी पारित केलेल्या क्र.डप/दुकान/२०२०/कावि.७०८/जा ४१३, दिनांक ०९.०९.२०२० च्या आदेशाविरुध्द वादी, श्री. परेश कुमार दामजी सावला (प्राधिकारपत्रधारक) अशिदु क्र. २३-ड-१११, दुकान क्र १ फेलिक्स डिसोजा चाळ, वाकोला व्हिलेज, सांताक्रुझ (पू) मुंबई ४०००५५ यांनी महाराष्ट्र अन्नधान्य शिधावाटप (व्दितीय) आदेश, १९६६ च्या खंड ३० मधील तरतूदीस अनुसरुन माझ्यासमोर सादर केलेल्या पुनरीक्षण अर्जास अनुसरुन प्रस्तुतचे प्रकरण उद्भवले आहे .

२. या प्रकरणाची सुनावणी माझ्यासमोर दिनांक २४.११.२०२० रोजी झाली. सदर सुनावणीस वादी स्वत: तसेच उप नियंत्रक शिधावाटप "ड" परीमंडळ, मुंबई हे उपस्थित होते.

३. प्रस्तुल प्रकरणाची थोडक्यात वस्तुस्थिती पुढील प्रमाणे आहे :- वादीच्या नावे अशिदु क्र.२३-ड-१११ या दुकानाचे प्राधिकारपत्र मंजूर आहे. प्रकृती चांगली नसल्याने सदर दुकानाच्या प्राधिकारपत्रात श्री. शेषराम भानाजी चौधरी यांना भागीदार म्हणून घेण्याबाबत वादी यांनी उप नियंत्रक शिधावाटप "ड "परिमंडळ, मुंबई यांच्याकडे अर्ज दाखल केला होता. तथापि, उप नियंत्रक शिधावाटप "ड "परिमंडळ, मुंबई यांनी दिनांक ०९.०९.२०२० च्या आदेशान्वये वादीचा अर्ज अमान्य केला आहे. सदर आदेशाने व्यथित होऊन वादी यांनी प्रस्तुतचा पुनरीक्षण अर्ज सादर केला आहे.

४. माझ्यासमोर झालेल्या सुनावणीच्या वेळी वादीकडून असे प्रतिपादन करण्यात आले की, वादीच्या नावे असलेल्या अधिकृत शिधावाटप दुकानाचे प्राधिकारपत्र बऱ्याच वर्षापासून कार्यान्वीत आहे. सदर दुकान वादी प्रामाणिकपणे व विनातक्रार चालवित आहे. वादीविरुध्द अद्यापपर्यंत कोणत्याही शिधापत्रिकाधारकांची तक्रार नाही. वादी ५५ वर्षाचे असून त्यांना एकट्याने दुकानाचे काम होत नाही. वादी अनेक आजाराने त्रस्त असून वादीची तब्बेत वारंवार बिघडत असल्याने वादीस दुकानात जास्त वेळ काम करता येत नाही. वादीस डॉक्टरांनी पूर्णपणे विश्रांती घेण्याचा सल्ला दिलेला आहे. सदर दुकानाच्या कार्यक्षेत्रातील लोकसंख्या अधिक असलयामुळे वादीस प्रकृती कारणास्तव एकट्याने दुकान चालविणे शक्य होत नाही. तसेच वादीच्या आजारपणामुळे वादीस व्यवसाय करणे कठीण जात असल्याने श्री. शेषराम भानाजी चौधरी हे वादीस सर्वतोपरी मदत करीत असतात. त्यामुळे

वादीच्या दुकानाच्या प्राधिकारपत्रात श्री. शेषराम भानाजी चौधरी यांचे नाव भागीदार म्हणून समाविष्ट करावे, अशी विनंती वादीने केली आहे.

५. प्रतिवादी अधिकाऱ्यांनी असे प्रतिपादन केले की, त्यांनी घेतलेला निर्णय योग्य असून तो कायम करावा.

६. वादी, प्रतिवादी अधिकारी यांच्या वतीने करण्यात आलेली प्रतिपादने व प्रस्तुत प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांवरुन माझ्या असे निदर्शनास आले की, वादीच्या नांवे अधिकृत शिधावाटप दुकानाचे प्राधिकारपत्र बऱ्याच वर्षापासून मंजूर आहे. वादीने प्रकृती कारणामुळे सदर प्राधिकारपत्रात श्री. शेषराम भानाजी चौधरी यांचे नाव भागीदार म्हणून समाविष्ट करण्याची विनंती केल्याचे दिसून येते. वादी अनेक आजाराने त्रस्त असून, वादीची वारंवार बिघडणारी तब्येत याबाबत वैद्यकीय सल्ल्यानुसार जास्त काम करण्यास मनाई केली आहे. तसेच कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी वादीकडे अन्य कोणतेही साधन उपलब्ध नसल्यामुळे वादीने केलेली विनंती पाहता, सदर दुकानाच्या प्राधिकारपत्रात श्री. शेषराम भानाजी चौधरी यांचे नाव भागीदार म्हणून समाविष्ट करण्यास हरकत नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणी न्यायालयीन प्रकरण प्रलंबित अथवा प्रस्तावित आहे किंवा कसे ही बाबही तपासावी. सदरच्या अधिकृत शिधावाटप दुकानाच्या मूळ प्राधिकारपत्रधारकास सदर भागीदारी संस्थेच्या प्राधिकारपत्रातून निवृत्त होता येणार नाही. तसे केल्यास सदर दुकानाचे प्राधिकारपत्र रद्द करण्याची कार्यवाही उप नियंत्रक, शिधावाटप 'ड' परिमंडळ, मुंबई यांनी करणे योग्य राहिल, या निष्कर्षाप्रत मी आलो आहे.

वर विवेचन केलेल्या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

-: आदेश:-

१. वादीचा, पुनरीक्षण अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीच्या दुकानाच्या प्राधिकारपत्रात श्री. शेषराम भानाजी चौधरी यांचे नाव भागीदार म्हणून समाविष्ट करण्यास या आदेशान्वये परवानगी देण्यात येत आहे.

३. प्रस्तुत प्रकरणी न्यायालयीन प्रकरण प्रलंबीत अथवा प्रस्तावित आहे किंवा कसे ही बाबही तपासावी. सदरच्या अधिकृत शिधावाटप दुकानाच्या मूळ प्राधिकारपत्रधारकास सदर भागीदारी संस्थेच्या प्राधिकारपत्रातून निवृत्त होता येणार नाही. तसे केल्यास सदर दुकानाचे प्राधिकारपत्र रद करण्याची कार्यवाही उप नियंत्रक, शिधावाटप 'ड' परिमंडळ, मुंबई यांनी करावी.

४. हे आदेश सर्व संबंधितांना कळविण्यात यावेत.

स्थळ: मंत्रालय, मुंबई.
दिनांक: २६/१२/२०२०

(छगन भुजबळ)
मंत्री
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण

FOOD, CIVIL SUPPLIES AND CONSUMER PROTECTION DEPTT.
GOVERNMENT OF MAHARASHTRA